# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१७.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

================================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा घडला असावा , असे वाटते. त्यामुळे कोणी समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या, उपदेश केला तर ते अपमानास्पद वाटून सहन होत नसावे. या राशीची लहान मुले तर सध्या अति हूड, व व्रात्य झाली असण्याची शक्यता दिसते. अशा स्वभाववैचित्र्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून काही तरी नवीन करण्याची उर्मी येणे शक्य दिसते. पण त्यांनी तसे करू नये. मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच मनापासून करावी. लहरी स्वभावामुळे अविचाराने आचरण झाल्यास आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. तसेच कुमार्गी मित्रांपासून जपा. नपेक्षा पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. काहीना नोकरीतून बडतर्फ होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींपैकी काहीचा त्यांच्या कर्तृत्वाने सन्मान होणे संभवते. तसेच काहींना बढती वा एखादे अधिकारपद मिळणेही संभवते. काहींना प्रवासाचे योग संभवतात. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच औषधविक्रेत्यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण या राशीच्या अष्टम स्थानी शत्रू राशीत असलेला शनि ग्रह काही असमाधानकारक घटना घडविण्याची शक्यता दिसते. अनारोग्य, अपेक्षाभंग होणे, कशाचे तरी भय निर्माण होणे, मूळ कर्जबाजारी असतील त्यांच्या कर्जात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांची शेतीवाडी आहे अशांना शेती व्यवसाय लाभदायक होईल. कौटुंबिक प्रगती होईल व धनलाभ होणेही शक्य आहे. पण राहूमुळे काही मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही संभवते. जपा. मंगळ ग्रहामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे श्रीगणेश स्तोत्र व श्रीहनुमान चालीसा स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्ध मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. गैरसमज, असमाधानकारक घटना, राहत्या जागेची किंवा स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. राहूमुळे अनारोग्य, कौटुंबिक त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात बंधुसुखात बाधा येणे संभवते. तसेच काही कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचाही त्रास होणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काही लाभदायक घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच काहींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने संततीच्या अनारोग्याची समस्या, स्वतःचे अनारोग्य, प्रिय जनापासून होणारे दूरत्व अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीचे विद्यार्थी मनापासून अध्ययन करून शैक्षणिक प्रगती करू शकतील. मानसिक आजार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा अखेरचा सप्ताह अधिक अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात केतू नवम स्थानी गेल्यावर काही मंडळींकडून ढोंगी वर्तन होणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या वक्री हर्षल ग्रहामुळे शत्रुत्व

निर्माण करणाऱ्या घटना घडणे संभवते. काहींना बेअब्रूच्या प्रसंगाना तोंड द्यावे लागेल. काहींना आर्थिक समस्या त्रस्त करतील. काहींना तर जिवावरच्या प्रसंगाला तोंड देण्याची पाळी येणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. तसेच काहींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. तसेच श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासनाही अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायाचे दृष्टीने तसेच कौटुंबिक सुखाचे दृष्टीने अनुकुल व सुखशांतीचा जाईल. पण दिनांक ८ पासून राहू या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. शुक्र ग्रह दिनांक १५ पासून या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. तसेच काहींना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता आहे. पण महिन्याचा उत्तरार्ध कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा आणणारा असण्याची दाट शक्यता आहे. पण गुरु ग्रहामुळे फारशी चिंताजनक परिस्थिती होणार नाही, असे वाटते. केवळ काही नात्यातील मंडळींकडून अकारण मनस्ताप दिला जाणे संभवते. पण या गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या काही मंडळींचे स्थावर खरेदी वा विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. पण चतुर्थ स्थानी रवि ग्रह आल्यावर अनारोग्याचा त्रास, नियोजित कार्यात अडथळे येणे, आर्थिक खर्चाची समस्या त्रस्त करणे, त्यामुळे नैराश्य येणे असे काही घडणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर काही मनोनुकुल घटना घडतील. प्रेमसंबंध, स्नेहसंबंध असतील, तर ते घट्ट होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, कोळसा लोखंड यांचा व्यापार असणाराना तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी केतू ग्रह आल्यावर प्रापंचिक सुखात व दाम्प्त्यजीवानातील सुखात बाधा येणे संभवते. अपघात भय आहे. जपा. तसेच काही मंडळींना त्वचा रोगाचा तर काहींना रक्तविकार व मुखदंतरोगाच्या आजाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. पण ज्यांना मनापासून आध्यात्माची आवड आहे त्यांनी इष्ट दैवताची उपासना केल्यास होणारा मनस्ताप सुसहय होईल. त्यासाठी भाग्यस्थानी असलेला नेपच्यून ग्रह अनुकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे व तो गुरु ग्रहाशी शुभ योग करत असल्याने काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. पण मित्रांशी मैत्री तुटणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. श्राद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना अनारोग्य आणि आर्थिक समस्या त्रस्त करण्याची दाट शक्यता दिसते. आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी काही मंडळींना खूप कष्ट -परिश्रम करावे लागतील. त्यामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. डोळे तळावणे, घसा, दाढा, मान यांपैकी कशाची तरी दुखणी त्रस्त करतील. जपा. या संपूर्ण महिन्याच्या काळात आर्थिक चिंता व उष्णता विकार त्रस्त करतील. जपा. अनपेक्षित मोठा आर्थिक खर्चाचा प्रश्न उभा राहील, त्यात देणे द्यावेच लागेल, पण येणे मात्र वसूल होणे कठीण होईल.

शिवाय आर्थिक फसवणूक होणेही संभवते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहात कौटुंबिक जीवनात भांडण तंटे होणे संभवते. जपा. दिनांक ८ पासून राहू या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर या राशीच्या काही मंडळींना सतत मनस्ताप देणाऱ्या व अपमानास्पद वाटणाऱ्या घटना घडणे संभवते. काहींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह धनस्थानी गेल्यावर कौटुंबिक परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा होईल. हा शुक्र काही ना काही लाभदायक गोष्टी घडवील. शिवाय रवि-बुध-गुरु हे तीनही ग्रह अनुकुल होणार असल्याने या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना , तसेच बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना , लेखक मंडळीना सुखकारक, प्रगतिकारक व लाभदायक होईल. कौटुंबिक सुख लाभेल. कोणाचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार असतील तर ते अपेक्षा पूर्ण करणारे व लाभदायक होतील. पण शनि ग्रह प्रतिकुल असल्याने संततिसुखात विविध कारणानी बाधा येणे संभवते. जपा. जलभय, विष भय असल्याने पाण्यापासून जपावे. तसेच उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना तसेच श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे अगत्याचे होईल. रवि-मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह प्रतिकुल असल्याने अकारण श्रम-दगदग होणे, उष्णताविकार, किंवा वातविकार बळावण्याची शक्यता दिसते. तसेच मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. तसेच नियोजित कार्यात अडचणी , अडथळे येणे, अधोगती होणे अशापैकी कारणांनी थकल्यासारखे वाटेल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर संयमपूर्वक आचरण केले पाहिजे. काहींना कुसंगतीचा तर काहींना मित्रद्रोहाचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे जपा. पण गुरु-शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अनुकुल असल्याने मधून मधून मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आप्तेष्टांशी भांडणे होणे संभवते. काहींना डोळ्याचे दुखणे त्रस्त करील. काहींना आर्थिक चिंता त्रस्त करतील, तर काहींना आर्थिक फसवणूक झाल्यामुळे अस्वस्थ वाटेल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात काहींचे ग्रंथलेखन पूर्ण होईल. काहींना प्रवासाचे योग येतील. तर काहींना भावंडापासून त्रास होणे संभवते. शनि ग्रहामुळे काहींच्या मातृसुखात बाधा येणे संभवते; तर इतरांना गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या वक्री नेपच्यूनमुळे व व्यास्थानी असलेल्या राहूमुळे दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण हाच राहू काहींना अर्थलाभ देणारा असेल' तर काहींना परदेशगमनाची संधी देणारा असू शकेल. भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. आपल्या अहंकारी व अधिकारशाही स्वभावावर नियंत्रण ठेवा व संयम, सहनशीलतेचे आचरण करा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर आपल्या कुलदैवताची तसेच श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीची मंडळी सध्या उगीचच काल्पनिक चिंता करत असाव्यात असे वाटते. शिवाय आपल्याला काही तरी आजार झाला असल्याची काल्पनिक चिंताही त्रस्त करीत असेल , असे वाटते. पण गुरु ग्रह अनुकुल असल्यामुळे त्यांनी अकारण आरोग्यविषयक कसलीही चिंता

करू नये. केवळ शनि ग्रहामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करू शकेल. पण या शनि ग्रहामुळे काही युवकांना नवी, उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. दिनांक ८ रोजी केतू ग्रह वक्र गतीने या राशीच्या पंचम स्थानी जाईल तेव्हा काहींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. पण गुरु-केतू शुभ योग होत असल्याने धर्म, वेदांत, गूढ अभ्यास, बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना तसेच या राशीच्या लेखकांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. दिनांक १२ पासून गुरु ग्रह या राशीच्या धनस्थानी गेल्यावर कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यापार-व्यवसाय असणाराना
व्यावसायिक वाढ करणे सहज शक्य होईल. अपेक्षित आर्थिक प्रगती होईल व कर्जदार असतील ते कर्जमुक्त होतील, असे वाटते. अपघात भय असल्याने या राशीच्या सर्वच मंडळींनी सतत अतिशय सावधानतेने आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे या महिन्याच्या प्रथम सप्ताहात काहींना अर्थलाभ तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण त्या सप्ताहात वैवाहिक जीवनातील सुखात काही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. नंतरच्या काळात काहीना संततिसमस्या त्रस्त करीलसे दिसते. वाम मार्ग धन मिळणे सहज शक्य होईल; पण तो मोह टाळाच. शुक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना व स्वतंत्र व्यवसाय असणारांना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहीना बढती, काहींना प्रसिद्धी तर काहींना धनलाभ होणे संभवते. काहींना नवे मित्र मिळतील; तर काहींना आहे त्यात सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवी ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर व राहू वक्र गतीने या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर लाभ हानिकारक अनुभव येतील व कधी चिंता तर कधी शांती असे अनुभव घेत काळ व्यतीत होईल. पण त्याच काळात लाभस्थानी गेलेल्या शुक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील व खूप बरे वाटेल. महिन्याच्या उत्तरार्धातच गुरु ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर आरोग्य सुधारेल, बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना विविध प्रकारे लाभ होतील. पण धनस्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनि ग्रहामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. जपा. काहींना कोर्ट प्रकरणाचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. महिन्याचा उत्तरार्ध गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे आध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल; तर गूढ संशोधन कार्यात कार्यमग्न असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व उत्साहवर्धक असल्याचा अनुभव येईल. पूर्वार्धात या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. हाच केतू दिनांक ८ पासून वक्र गतीने या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर मानसिक चिंता वाढण्याची शक्यता दिसते. घरात कोणाशी पटणार नाही. त्या काळात विषबाधा होणे संभवते; म्हणून बाहेरील उघड्यावरचे खाद्यपदार्थ सेवन करू नका. हर्षलमुळे जीवनसाथीचे विचित्र , लहरी, विक्षिप्त आचरणामुळे, दोघांतील मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत संशय, न पटणे अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा

असेल तर कुलदैवताची व श्रीहनुमानाची उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनि ग्रहामुळे स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. तसेच कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे स्थलांतर झाल्यामुळे अस्वस्थ वाटून नैराश्य येणे संभवते. घरगुती बाबतीत काही घोटाळे, गडबड झाली असल्यास, गैरसमज झाले असल्यास कौटुंबिक संबंधात तणाव निर्माण होणे संभवते. असा त्रास महिन्याच्या पहिल्या सप्ताहात अधिक होणे संभवते. जपा. दिनांक ८ पासून केतू या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल. पण मानसिक व्यथा तशाच राहतील. अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मनस्थिती शांत राहील. या राशीच्या काही मंडळीना डोकेदुखीचा तर काहींना मेंदुविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. तसेच काही मंडळींना मुदतीच्या तापाचा आजार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत भाग्यस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. पण राहू ग्रह वक्र गतीने या राशीच्या भाग्यस्थानी आल्यावर कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, इच्छा आकांक्षा पूर्ण करणारा यश धनदायक असल्याचा अनुभव येईल. पण पूर्वार्धात सोबत मंगळ ग्रह असल्याने नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद, वाद होणे संभवते. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करणे व यश मिळविणे सहज शक्य होईल. या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील. पण याच गुरूमुळे महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. तसेच नव्या अडचणी निर्माण होणे, अपेक्षाभंग होणे संभवते. पण अध्यात्म व सामाजिक कार्याची आवड असणारांना मात्र हा गुरु ग्रह अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे श्रीहनुमान चालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना तुलनात्मक दृष्ट्या या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल, असे दिसते. महिन्याचा पूर्वार्ध मनस्ताप दायक असण्याचीच शक्यता जाणवते. पण आध्यात्मिक उपासनेद्वारे मन शांत व स्थिर राहू शकेल. विशेष करून आर्थिक चिंता त्रस्त करतीलसे दिसते. व्ययस्थानी शत्रुराशीतील शनि ग्रह असल्याने व काळ शनी ग्रहाच्या साडेसातीचा असल्याने सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावेत. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. काहींना मानहानीचा तर काहींना गंभीर अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहात कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. पण चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना, सर्व प्रकारच्या कलाकारांना , गूढ संशोधन विषयात रस असणारांना कल्पना विलासी लेखकांना, अध्यात्मात रस असणारांना तसेच शासकीय ,निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध खूपच अनुकुल, लाभदायक व यशदायक होणे संभवते. पण काळ वेळ पकडणे जमले पाहिजे. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग

येतील. या महिन्याच्या प्रथम सप्ताहात वैवाहिक जीवनातील सुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. पण नंतरच्या संपूर्ण काळात संततिविषयक समस्या त्रस्त करतीलसे दिसते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे व लाभास्थानी गेलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळीना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर काहींना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होणे शक्य दिसते. या राशीच्या विवाहेच्छू युवक-युवतींचे विवाह ठरतील. या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने त्यांनी मन:शांतीसाठी श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची तसेच श्रीहनुमानाची उपासना करावी. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे व "हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करावे.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या प्रथम सप्ताहात अपघात भय आहे. त्यामुळे या काळात त्यानी अति सावधानपणे सतत आचरण करावे. त्यानंतर च्या काळात काही मंडळींना आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण होतील याची चिंता त्रस्त करील. काहींना आर्थिक व्यवहारात झालेल्या घोटाळ्याना सामोरे जावे लागेल. काही मंडळींना चोरी झाल्यामुळे, काहीना आर्थिक फसवणूक झाल्यामुळे तर काहींना आचरणातील हलगर्जीपणामुळे निर्माण होणारी आर्थिक समस्या
त्रस्त करील. जपा. वर्तमान तक्रारखोर स्वभावामुळे कशाही परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही.
कोणाशी पटणारही नाही. अशा सर्व कारणांनी वास्तुसुख व कौटुंबिक सुखसमाधान कसे लाभेल ? या महिन्या च्या प्रथम सप्ताहात वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल; पण नंतर राहू सप्तम स्थानी आल्यावर विचार विकृत होणे संभवते. त्यामुळे कपटी विचार निर्माण होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न करणे, कुसंगतीची बाधा होणे, अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. शिवाय अनारोग्याचा त्रास होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण त्यातल्यात्यात बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ थोडा बरा जाणे संभवते. शिवाय जन्मकुंडलीत योग असतील तर काहींना अपेक्षित मनोकामना पूर्ण झाल्याचा अनुभव येईल. अध्यात्मात रस असणारांना उपासने द्वारे सात्विक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली व्यवसाय, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास असल्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच उष्णता विकारांनी स्वत:चे आरोग्य बिघडणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना आणि श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय कोमल झाला असावा, असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात . तसे असेल तर या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या प्रथम सप्ताहात सतत सावधानतेने आचरण करावे असे सांगावेसे वाटते. कारण अपघात भय संभवते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात काही मनोनुकुल घटना घडण्याची शक्यता दिसते. कौटुंबिक जीवनात जीवनसाथीची अनारोग्यविषयक समस्या

त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच वैवाहिक जीवनातही दोघांतील वाद, मतभेद अशापैकी कारणांनी अपेक्षित सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. ज्यांची काही कोर्ट प्रकरणे असतील त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. काहींच्या मनात कपटी विचार निर्माण होतील. जपा. महिन्याच्या उतरार्धात ज्यांचा पर धर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे, अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. पण काहींना कुसंगतीची बाधा होणेही शक्य दिसते. जपा. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीचा काही मंडळींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्क्काने धनलाभ होणे संभवते. तसेच काहींना भूमिलाभ वा सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होईलसे दिसते. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काहींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. वकिली-सल्लागारी व्यवसाय, तसेच लोखंड , कोळसा व्यापारी यांना महिन्याचा उत्तरार्ध प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना
अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे शिव महिम्न स्तोत्राचे पठन करा. तसेच "ओम नाम:शिवाय " मंत्राचा एक माळ नियमितपणे जप करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव सुखासक्त, गुलहौशी, लहरी झाला असला तरी थोड्याच दिवसांत तो अधिक लहरी होणे संभवते. अशा अवस्थेत मानसिक संवेदना शीघ्र होत असतील तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. विकृत विचार घर करतील. काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना काळ लाभदायक होईल.
उच्च बौद्धिक तसेच शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना तसेच कोळसा, लोखंड व्यापार असणाराना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे विविध कारणांनी सुखी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे अशा कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. काही कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीसह संततिविषयक समस्या त्रस्त करतील. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. तर काहींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर काहींना प्रवासाचे योग येतील, काहींना प्रसिद्धी मिळेल तर काहीना आध्यात्मिक उपासने द्वारे मन:शांती मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====